देहविक्री करणाऱ्या महिलांच्या पाल्यांसाठीचे 'शेल्टर होम' बंद

■ मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर; मात्र अद्याप उत्तर नाही
■ प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे मुलांना नरकयातना

योगिता साळवी

मुंबई, दि. ९ : कामाठीपुरा भाग तसा मुंबईकरांना परिचित आहे. वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांची वस्ती म्हणून कामाठीपुरा ओळखले जाते. या महिलांच्या पाल्यांना रात्रीचा निवारा देण्यासाठी सेवाभावी संस्थांच्या वतीने बांधण्यात आलेले 'शेल्टर होम' (निवारा घर) मागील अनेक दिवसांपासून कोरोनामुळे बंद करण्यात आलेले आहेत. त्यामुळे कोवळ्या वयातील मुला-मुलींना देहविक्री सुरू असणाऱ्या घरात रात्री राहावे लागते आहे, ही वस्तुस्थिती आहे.

वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांच्या व्यथांचा विचार कोण करणार? असा सवाल आता निर्माण झाला आहे. त्यामुळे, ''या मुलांचे 'शेल्टर होम' सुरू करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना काही महिन्यांपूर्वी निवेदन देण्यात आले होते. मात्र, अद्यापि त्या निवेदनावर मुख्यमंत्र्यांचे उत्तर आलेले नाही,'' अशी माहिती काही सामाजिक कार्यकर्त्यांनी दिली.

''देहविक्री करणाऱ्या महिलांच्या पाल्यांसाठी कामाठीपुरा पॉकलंड रोड येथे काही सेवाभावी संस्था 'शेल्टर होम' चालवतात. २०२०मध्ये आलेल्या कोरोना महामारीमुळे या 'शेल्टर होम'वर सरकारतर्फे निर्बंध लावण्यात आले आणि पर्यायाने तेव्हा त्या 'शेल्टर होम'ला टाळे लावण्यात आले. पर्यायाने नाइलाजास्तव 'शेल्टर होम'मधील मुलांना देहविक्री व्यवसाय असलेल्या वस्तीत वास्तव्यास जावे लागले. काही मुलांना न्हाणीघर किंवा शौचालयात बसून रात्र काढावी लागते. काही मुलं रात्रभर घराबाहेर थांबतात. नशेबाज लोकांची वर्दळ वस्तीत असल्यामुळे मुलांना नशेचे व्यसन लागण्याचे प्रमाण वाढले आहे. शाळेत किंवा 'शेल्टर होम'मध्ये राहिल्यामुळे या वस्तीतील

> "माजी कुलगुरू भालचंद्र मुणगेकर यांच्या साहाय्याने आम्ही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना 'शेल्टर होम' सुरू करण्यासंदर्भात निवेदन दिले होते. पण, अजून काही उत्तर आले नाही. या वस्तीतील बालकांचे भविष्य चांगले व्हावे म्हणून कितीतरी दशकं आम्ही काम केले. पण, आता कोरोनामध्ये या मुलांना नाइलाजाने त्यांच्या त्या वस्तीतल्या घरात राहावे लागले. या दोन वर्षांत २४ तास आम्ही त्यांच्या संपर्कात राहूच शकलो नाही. या मुलांचे भविष्य आमच्या हातून निसटले की काय, या विचाराने मी खूप अस्वस्थ आहे. सरकारने तत्काळ ही 'शेल्टर होम्स' सुरू करावीत.
>
> **-विनय वत्स,** सचिव, साई इंटिग्रेशन संस्था

मुली कुणाच्या दृष्टीत पडत नसत. मात्र, आता या मुलीही आईसोबत घरीच रात्र काढत असल्यामुळे त्यांचेही शोषण होण्याची शक्यता वाढली आहे,'' अशी भीती काही सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. कोरोना नियमावलीमध्ये शोषितांपेक्षाही शोषित असलेल्या या वस्तीतील निष्पापांचा विचार प्रशासनाने केला असता, तर देहविक्री करणाऱ्या महिलांच्या पाल्यांची कोरोनाकाळातली ही दुर्दक्षा झाली नसती, हे वास्तव आहे. त्यामुळे या वस्तीतले आम्हाला रात्रीचा निवारा देणारे 'शेल्टर होम' कधी सुरू होतील? आणि आमची दररोजच्या नरकयातनेतून कधी सुटका होईल? असा हृदयद्रावक प्रश्न आता हे चिमुकले विचारू लागले आहेत.



(छाया : योगेश कुंभार)

मुंबई : भारतीय जनता पक्षाच्या उत्तर भारतीय आघाडीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संजय पांडे यांनी सोमवार, दि. ९ ऑगस्ट रोजी दै. 'मुंबई तरुण भारत'च्या वडाळा येथील मुख्य कार्यालयाला भेट दिली. यावेळी दै. 'मुंबई तरुण भारत'चे व्यवसाय प्रतिनिधी रवींद्र जाधव आणि मुंबई महापालिका प्रतिनिधी ओम देशमुख यांनी संजय पांडे यांना 'कालजयी सावरकर' हे पुस्तक भेट म्हणून दिले.

Vinyl Chemicals (India) Limited

CIN: L24100MH1986PLC039837
Regd. Office: 7th Floor, Regent Chambers, Jamnalal Bajaj Marg, 208, Nariman Point, Mumbai - 400 021.
Tel: 2282 2708 **Fax:** 2204 3969 **E-mail:** cs.vinylchemicals@pidilite.com **Website:** www.vinylchemicals.com

EXTRACT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30.06.2021

(₹ In lakhs)

Particulars	For the Quarter ended		For the Year ended	
	30.06.2021	30.06.2020	31.03.2021	31.03.2020
	Unaudited	Unaudited	Audited	Audited
Total income	15199	3012	40552	37606
Profit/(loss) for the period before tax	843	158	1524	999
Profit/(loss) for the period after tax	628	116	1135	746
Total Comprehensive Income for the period [comprising Profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)]	628	115	1133	743
Equity Share Capital (Face value of share: ₹ 1)	183	183	183	183
Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year			6625	5931
Earnings per share of ₹ 1 each in ₹:				
Basic	@3.43	@0.63	6.19	4.07
Diluted	@3.43	@0.63	6.19	4.07

@ For the period only and not annualised

Notes:

The above is an extract of the detailed Unaudited Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full Unaudited Financial Results are available on the Websites of BSE Ltd. www.bseindia.com and National Stock Exchange of India Ltd. www.nseindia.com and on the Company's Website www.vinylchemicals.com.

Mumbai
Dated: 9th August, 2021

M.B. PAREKH
Chairman & Managing Director
(DIN: 00180955)

जाहीर सूचना

आम्ही खाली नमूद केल्याप्रमाणे भारतीय रहिवासी, राहणारे १४०५/१४, साईनिकेतन सोसायटी, बिल्डींग नं. ६, सदानंद हसू तांडेल मार्ग, कल्याणदास उद्योग भवन जवळ, सेंच्युरी बाजार, प्रभादेवी, मुंबई- ४०००२५. आम्ही जाहीर करतो की, **कै. चंद्रभागा खेमजी साटम** यांचे दि. २८/०४/२०२१ रोजी निधन झाले आहे. ते वैयक्तिक कायद्यानुसार खालील कायदेशीर वारसांना सोडून गेले आहेत.

१) मंगला खेमजी साटम (वय ५३) मुलगी
२) संदीप खेमजी साटम (वय ४६) मुलगा

वर उल्लेख केल्याशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. गिरणी कामगाराच्या सदनिकेला वारस लावण्यासाठी हे कायदेशीर वारस प्रमाणपत्र आवश्यक आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०९/०८/२०२१

मराठी माध्यमातून शिकल्याने पदभरतीत नाकारलेल्या १५० शिक्षकांना न्याय कधी मिळणार?

१५ दिवसांत उत्तर न मिळाल्यास मुंबई भाजपचे आंदोलन; भाजप नेते प्रतीक कर्पे यांचा इशारा

मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी): ''बृहन्मुंबई महापालिकेतर्फे होणाऱ्या शिक्षक पदभरतीत केवळ मराठी माध्यमातून शिकलेल्या शिक्षकांना नाकारल्याची घटना चार महिन्यांपूर्वी घडली होती. याबाबत मी जून २०२१ मध्ये पालिका प्रशासनाला पत्र लिहिले होते. मात्र, पत्र लिहून एक महिना उलटूनही यावर पालिका प्रशासनाने अपेक्षित उत्तर दिलेले नाही. त्यामुळे या प्रश्नावर येत्या १५ दिवसांत उत्तर न मिळाल्यास मुंबई भाजपच्या वतीने पालिका प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल,'' असा थेट सूचक इशारा महापालिका शिक्षण समिती सदस्य प्रतीक कर्पे यांनी सोमवारी दिला. ''केवळ मराठी माध्यमातून शिक्षण झाल्याने १५० शिक्षकांना मुंबई महानगरपालिकेमार्फत होणाऱ्या शिक्षक पदभरतीत नाकारण्यात आले. याबाबतचा प्रस्ताव मार्च महिन्यात शिक्षण समितीत मांडला होता. चार महिने उलटूनही या प्रस्तावावर कोणतेही पाऊल उचलले गेले नाही. याविषयी जाब विचारला असता संबंधित विषय राज्य सरकारच्या अखत्यारीत येत असल्याचे सांगितले जाते व पालिकेला प्रस्ताव दिल्याचे राज्य सरकार सांगते. अशा गंभीर बाबती सुरू असलेले हे राजकारण योग्य नाही,'' असे प्रतीक कर्पे यांनी म्हटले आहे.

सूचना

जनतेच्या माहितीकरिता याद्वारे सूचना देण्यात येते की, सो. सुजाता हरिहरन अय्यर आणि श्री. हरिहरन अय्यर हे चाफेकर बंधु मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१ येथे स्थित चंदन को-ऑप. हौ. सोसा. लि. या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ३०३ मोजमाप अदमासे ६५३ चौ. फू. कार्पेट क्षेत्रफळ या सदनिकेचे संयुक्त धारणकर्ते होते आणि सौ. सुजाता हरिहरन अय्यर या संस्थेच्या बोनाफाईड सदस्य आहेत आणि सदर संस्थेच्या भाग प्रमाणपत्र क्र. ११ अंतर्गत डिस्टिंक्टीव्ह क्र. ५१ ते ५५ (दोन्ही समाविष्ट) धारण केलेल्या रु. ५०/- प्रत्येकी किंमतीचे पाच पूर्णतः भरणा केलेले भाग त्यांच्या ताब्यात आहेत. (यापश्चात "सदर भाग" आणि "सदर सदनिका" असे संक्षिप्तरित्या उल्लेखित) श्री. हरिहरन अय्यर मृत्यूपत्र न बनविता दि. ११.०३.२०१५ रोजी मरण पावले. त्यांच्या मागे खालील त्यांचे केवळ कायदेशीर वारस आहेतः

(i) सौ. सुजाता हरिहरन अय्यरः पत्नी
(ii) श्री. निखिल हरिहरन अय्यरः मुलगा

वर उल्लेखित्या व्यतिरिक्त श्री. हरिहरन अय्यर यांच्या पश्चात इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

माझे अशील सदर सदनकिा खरेदी करू इच्छितात. आयसीआयसीआय बँकेच्या प्रभाराव्यतिरिक्त, सर्व व्यक्ती, शासकीय प्राधिकरण, बँक/बँका, वित्तीय संस्था इ. यांचा सदर सदनिका किंवा तिच्या कोणत्याही भागावर गहाणवट, भेट, विक्री, ताबा, वारसा, भाडेपट्टी, परवाना, धारणाधिकार, अदलाबदल, देखभाल, प्रभार, न्यास, करारनामा, हिस्सा, वहिवाट किंवा इतर कोणत्याही प्रकारे किंवा कोणताही दावा असल्यास त्याबात निम्नस्वाक्षरीकारांना, त्यांच्या श्री आर्यादुर्गा, हुतात्मा चाफेकर बंधू मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०० ०८१ येथील कार्यालयामध्ये सदर जाहिरात प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या आत लेखी कळवावे, असे न केल्यास असा कोणताही दावा नाही असे समजले जाईल आणि जर असे काही असल्यास तो सोडून दिला किंवा गुंडाळून ठेवला असे समजले जाईल आणि त्यापश्चात करण्यात आलेल्या अशा कोणत्याही दाव्याचा संदर्भ न घेता माझे अशील सदर सदनिकेच्या बाबतीतील व्यवहार करण्यास मुक्त असतील.

(दर्शना एम. द्रवीड)
वकील, उच्च न्यायालय

मराठी भाषेला लवकर 'राजभाषा' दर्जा देण्यात यावा

खा. गोपाळ शेट्टी यांची लोकसभेत मागणी

मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी): ''मराठी भाषा हा मराठी संस्कृतीचा अस्सल आधार आहे. त्यामुळे मराठी भाषेला लवकरात लवकर अभिजात भाषेचा दर्जा देण्यात यावा,'' अशी मागणी भाजपचे उत्तर मुंबईचे खासदार गोपाळ शेट्टी यांच्या वतीने सोमवार, दि. ९ ऑगस्ट रोजी याबाबत लोकसभेत मागणी करण्यात आली. खा. गोपाळ शेट्टी यांच्या कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासाठी खा. शेट्टी २०१७ लोकसभेत मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा म्हणून प्रश्न उपस्थित केला होता. तसेच त्यांनी या विषयात मागील वर्षी केंद्रीय मंत्री रमेश पोखरियाल आणि प्रल्हाद सिंह पटेल यांच्याशी चर्चादेखील केली होती, असे खा. शेट्टी यांच्या कार्यालयाने प्रसिद्धीस दिलेल्या माहितीत म्हटले आहे.

मराठी कलावंतांच्या आंदोलनाला भाजपचे समर्थन

मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी): 'लॉकडाऊन'मुळे अडचणीत आलेल्या मराठी कलावंतांच्या वतीने सोमवार, दि. ९ ऑगस्ट रोजी राज्यातील सत्ताधारी ठाकरे सरकारविरोधात राज्यभर आंदोलन करण्यात आले. यातील एक आंदोलन दादर-हिंदमाता येथे दादासाहेब फाळके यांच्या पुतळ्याजवळ करण्यात आले. ''आम्हाला आमचे म्हणणे सरकार पुढे मांडू द्या,'' अशी विनंती हे कलावंत सरकारकडे करीत होते. पण, सरकारतर्फे कलावंतांसोबत चर्चेसाठी कुणीही आले नाही आणि काही कालावधीनंतर या कलाकारांतर्फे भोईवाडा पोलीस ठाण्यात जाऊन ठिय्या आंदोलन करण्यात आले.

वनवासींच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शासन सर्वतोपरी सकारात्मक : राज्यपाल

मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी): ''विकासापासून दूर राहिलेल्या समाज घटकांना आधुनिक शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक असून, त्या समाजाची संस्कृती आणि परंपरा जपणेही गरजेचे आहे. वनवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करण्यासाठी सकारात्मक आहे,'' असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

सोमवार, दि. ९ ऑगस्ट रोजी 'जागतिक आदिवासी दिना'निमित्त राजभवन येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी वनवासी बांधवांना संबोधित करताना राज्यपाल कोश्यारी बोलत होते.

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी म्हणाले की, ''देश निर्माणासाठी वनवासी बांधवांचा मोठा सहभाग असून, त्यांनी स्वतःच्या व समाजाच्या प्रगतीसाठी स्वावलंबी होणे गरजेचे आहे. त्यांच्या सर्वतोपरी प्रगतीसाठी केंद्र व राज्य शासन प्रयत्नशील आहेत.''

या कार्यक्रमास विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, आमदार धर्मराव आत्राम, आमदार विक्रम काळे, माजी खासदार हुसेन दलवाई यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रतीक्षानगरातील रहिवाशांना हक्काचे घर कधी मिळणार?

■ राजकारण्यांनी अवैधरीत्या घरे लाटली; स्थानिकांचा आरोप
■ 'म्हाडा' भाडे घेते; मात्र संक्रमण शिबिरात पायाभूत सुविधा नाहीत

योगिता साळवी

मुंबई, दि. ९ : शहरातील प्रतीक्षानगर भागामध्ये राहणारे नागरिक मागील ४०-५० वर्षांपासून स्वतःच्या घराच्या पुनर्विकासाच्या आशेत दिवस काढत आहेत. मात्र, इतकी वर्षे उलटून गेली तरी संक्रमण शिबिरात राहणाऱ्यांना आपल्या हक्काची घरे कधी मिळणार? या प्रश्नाचे उत्तर अद्यापही कुणी देऊ शकलेले नाही. स्थानिक राजकारण्यांनी अवैधरीत्या घरे लाटली, असा आरोपही रहिवासी करत आहेत.

''या शिबिरात राहणाऱ्या नागरिकांना पात्र-अपात्र ठरवत अनेक जाचक नियम लादले गेले आहेत. त्या नियमांच्या अतिरेकामुळे मात्र स्थानिक रहिवाशांची ससेहोलपट होत आहे. स्थानिकांना जी तात्पुरती घरे 'म्हाडा'तर्फे देण्यात आली आहेत, त्यांनादेखील त्या घरांसाठी 'म्हाडा'तर्फे शुल्क आकारते जाते. मात्र, शुल्क आकारूनही त्या घरांमध्ये पायाभूत सुविधा मिळत नाहीत,'' अशी तक्रार स्थानिक रहिवाशांनी केली आहे.

प्रतीक्षानगरच्या संक्रमण शिबिरात ३० ते ४० टक्के लोक गेले ५० वर्षे घराचा पुनर्विकास होईल आणि आपण पुन्हा आपल्या घरात जाऊ, या प्रतीक्षेत आहेत. ५० वर्षांत या लोकांच्या घराची पुनर्बांधणी झालेलीच नाही. यातील कित्येकांची घरांची

परिस्थिती 'जैसे थे'च आहे. तर काहींच्या घराच्या जागेवर भलत्याच लोकांनी कब्जा केल्याचेही दृश्य आहे. आता आपले कायमचे घर म्हणजे संक्रमण शिबीर, असेच या लोकांना वाटत आहे. 'म्हाडा'च्या माध्यमातून ३० ते ४० टक्के संक्रमण शिबिरातील लोकांना अपात्र घोषित करून, त्यांना ५०० रुपयांऐवजी तीन हजार रुपये भाडे लावण्यात आले आहे.

गळतीची समस्या मोठी

प्रतीक्षानगर भागातील संक्रमण शिबिरातील सर्वात मोठी समस्या म्हणजे गळती. या भागातील अनेक इमारतींमधील बऱ्याच घरांमध्ये गळतीची समस्या खूप मोठ्या प्रमाणात आहे. तसेच घरांमधील दरवाजेदेखील निकृष्ट दर्जाचे असल्याची तक्रार रहिवासी करत आहेत.

पाण्याचा अनियमित पुरवठा

प्रतीक्षानगर भागातील इमारतींना पाणीपुरवठा करण्यासाठी पाण्याचे दोन पंप आहेत. मात्र, त्यातील एक पंप कायम बंद आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे स्वाभाविकरीत्या भागातील काही इमारतींमध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा होतो. ''आमचे घर धोकादायक आहे किंवा पुनर्विकास करत आहोत, असे सांगून 'म्हाडा'ने आमची रवानगी संक्रमण शिबिरात केली. त्याला वर्षे लोटली आहेत. आता आम्हाला आमची हक्काची घरे कधी मिळतील? घरे मिळणारच नसतील, तर किमान संक्रमण शिबिरातील पायाभूत सुविधा तरी चांगल्या द्याव्यात,'' अशी केविलवाणी विनंती संक्रमण शिबिरातील रहिवाशांनी प्रशासनाकडे केली आहे.

> "इथे स्थानिक राजकारण्यांनी खोटी कागदपत्रे तयार करून घर लाटली आहेत. त्यामुळे ते संक्रमण शिबिरातील लोकांचा विचार करताना दिसत नाहीत. काही लोकांना 'म्हाडा' अपात्र ठरवत आहे. मात्र, अपात्र ठरवूनही त्यांच्याकडून तीन हजार रुपये भाडे घेत आहे. त्यामुळे संक्रमण शिबिरातील लोकांनी काय करावे? त्यांना त्यांच्या हक्काचे घर लवकरात लवकर मिळावे, इथे राहत असताना पायाभूत सुविधा मिळाव्यात, यासाठी प्रशासनाने, सरकारने आणि संबंधित सर्वांनी विचार करावा, कृती करावी, अशी आमची मागणी आहे.
>
> **दत्ता केळुस्कर,** वॉर्ड अध्यक्ष १७३, प्रतीक्षानगर, भाजप

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: २७ बीकेसी, सी-२७, जी ब्लॉक, बांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.
कॉर्पोरेट कार्यालय: कोटक इन्फिनिटी, झोन-II, ४था मजला, इमारत क्र. २१, इन्फिनिटी पार्क, ऑफ प. दू. महामार्ग, गोरेगाव, मुंबई-४०० ०१७.
शाखा/विभागीय कार्यालय: अँडमास प्लाझा, ४ था मजला, १६६/१६, सीएसटी रोड, कोलिवेरी गाव, कुंची कुर्वे नगर, हॉटेल हरे कृष्णा जवळ, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव सह जाहीर सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन २००२ च्या नियमन ८(६) अन्वये

सर्वसाधारण जनतेस आणि विशेषतः कर्जदार(रां)ना आणि जामीनदार(रां)ना याद्वारे सूचना देण्यात येते की, प्रतिभूती धनको यांच्याकडे गहाणवट/प्रभारित असलेल्या निम्न उल्लेखित स्थावर मालमत्ता, ज्यांचा **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड (केएमबीएल)**/प्रतिभूती धनको यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे **प्रत्यक्ष ताबा** घेण्यात आला आहे, त्यांची खाली लिहिलेल्या कर्जदार आणि जामीनदार(रां)कडून **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड (केएमबीएल)**/प्रतिभूती धनको यांना देय निम्नउल्लेखित देणी व वसुली होईपर्यंतच्या दिनांकापर्यंतचे त्यावरील पुढील व्याज आणि इतर खर्च वसूल करण्याकरिता सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ अन्वये याखाली उल्लेखिलेल्या दिनांकास **"जसे आहे जेथे आहे"**, **"जसे आहे जे आहे"** आणि **"तेथे जे आहे"** तत्त्वावर विक्री करण्यात येणार आहे. स्थावर मालमत्ता जिचे तपशील खाली दिलेले आहेत, स्थावर मालमत्तेच्या, जिचा तपशील खाली दिलेला आहे, विक्रीकरिता निम्नस्वाक्षरीकारांद्वारे आमच्या विक्री आणि पणन आणि ई-लिलाव सेवा भागिदार, **मे. नेक्सझेन सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड (नेक्सझेन)** यांच्या वेब पोर्टल म्हणजेच https://DisposalHub.com द्वारे ऑनलाईन सादर करण्याकरिता प्रस्ताव मागविण्यात येत आहेतः

कर्जदारांचे /सह-कर्जदारांचे / जामीनदारांचे / गहाणवटदारांचे नाव	१३(२) मागणी सूचनेचा दिनांक आणि रक्कम	ताब्याचा दिनांक	मालमत्तेचा तपशील
कर्ज खाते क्र.: IHL85210 १) भरत बाबलदास पटेल **(कर्जदार)** २) **कैलाशबेन भरत पटेल (सह-कर्जदार)**	**मागणी सूचना दिनांक: २१.०४.२०१६** **₹ ४२,६२,६२४.५०/- (रुपये बेचाळीस लाख बासष्ट हजार सहाशे चोवीस व पैसे पन्नास मात्र)**	११.०२.२०२०	सदनिका क्र. ५०३, ५ वा मजला,सुदर्शन स्काय गार्डन्स, जास्मिन, बी विंग, घोडबंदर रोड, ठाणे (पश्चिम), ठाणे-४०० ६०७ या मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे

राखीव किंमत	ईएमडी (इसारा रक्कम अनामत)
₹७४,०३,४००/- (रुपये चौऱ्याहत्तर लाख तीन हजार चारशे मात्र)	₹७,४०,३४०/- (रुपये सात लाख चाळीस हजार तीनशे चाळीस मात्र)
बोली विस्तार रक्कम	**ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ**
₹५०,०००/-	**दि. २६ ऑगस्ट, २०२१ वेळः स. १०.३० ते दु. १.००**

ई-लिलावाच्या अटी आणि शर्तीः

(१) बोली कागदपत्रांच्या पुढील अटी आणि शर्तीनुसार आणि त्यामध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार लिलाव घेण्यात येईल. बोली प्रपत्रे, ई-लिलावाकरिता तेवण्यात आलेल्या तारण मालमत्तांचे तपशील आणि बोली अर्ज जो ऑनलाईन सादर करावयाचा आहे, त्याकरिता बोलीदारांनी आमच्या विक्री आणि पणन आणि ई-लिलाव सेवा भागिदार, मे. नेक्सझेन सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड (नेक्सझेन) यांच्या वेबसाईट म्हणजेच https://DisposalHub.com/KOTAK येथे भेट द्यावी; **(२)** सर्व इच्छुक खरेदीदार/ बोलीदारांनी उपरोल्लेखित दिनांक आणि वेळेस ई-लिलावामध्ये भाग घेण्याकरिता वर उल्लेखिलेल्या वेब पोर्टल https://DisposalHub.com येथे त्यांचे नाव नोंदणीकृत करणे आणि स्वतःच त्यांचा युजर आयडी आणि पासवर्ड विनाशुल्क बनविणे आवश्यक आहे; **(३)** प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, मालमत्ते/तांवर कोणताही बोजा नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी मालमत्ता आणि तिच्या कागदपत्रांची दि. १२.०८.२०२१ रोजी स. ११.०० ते दु. ०१.०० या वेळेत तपासणी करावी आणि त्यांनी ई लिलावास उेवण्यात आलेल्या मालमत्ते/तांचे बोजा, शीर्षक आणि मालमत्तेस बाधक असणाऱ्या दावे/हक्क/देणी याबाबत त्यांची बोली सादर करण्यापूर्वी त्यांची स्वतंत्र चौकशी देखील करावी. ई-लिलाव जाहिरात केएमबीएलची कोणतेही बांधिलकी अथवा कोणतेही सादरीकरण दर्शवीत नाही. मालमत्ता केएमबीलला ज्ञात आणि अज्ञात सर्व विद्यमान आणि भविष्यातील बोजांसह विक्री केली जाईल. प्राधिकृत अधिकारी/प्रतिभूती धनको कोणत्याही तृतीय पक्षाच्या दावे/ हक्क / देणी यांना जबाबदार असणार नाही. **(४)** ई-लिलावामध्ये भाग घेण्याकरिता, इच्छुक खरेदीदार/बोलीदारांनी वर उल्लेखिल्यानुसार तारण मालमत्तेच्या व्याज मुक्त परतावायोग्य **इसारा रक्कम अनामत (ईएमडी) 'कोटक महिंद्रा बँक लि'** च्या नावे डिमाण्ड ड्राफ्ट किंवा **बँकेचे नाव - कोटक महिंद्रा बँक लि., शाखा - नरिमन पॉईंट, मुंबई, बँक खाते क्र.- ०६४१०१२५२७२००१, आयएफएससी कोड- केकेबीके०००००१५८** या खाते तपशिलावर **आरटीजीएस / एनईएफटी** द्वारे प्रदान केल्याचा तपशील व त्यासह पॅन कार्ड, आधार कार्ड, निवासी पत्त्याचा पुरावा, कंपनी असल्यास मंडळाचा ठराव आणि पत्त्याच्या पुराव्याच्या स्वयं साक्षांकित प्रती **दि. २६ ऑगस्ट, २०२१ रोजी सायं. ०४.०० वा. किंवा त्यापूर्वी** वेब पोर्टल (**https://DisposalHub.com/KOTAK**) येथे सादर/अपलोड कराव्या; **(५)** मालमत्ता राखीव किंमतीच्या खाली विकली जाणार नाही. यशस्वी खरेदीदार/ बोलीदार यांनी ई-लिलाव पूर्ण झाल्यापासून २४:०० तासांच्या आत वर उल्लेखिलेल्या खात्यांमध्ये आरटीजीएस/एनईएफटीद्वारे त्याच्या/तिच्या प्रस्तावाच्या २५% (ईएमडी समाविष्ट) रक्कम जमा करावयास हवी, असे न केल्यास विक्री अयशस्वी झाली असे मानण्यात येईल आणि सदर यशस्वी बोलीदाराची ईएमडी जप्त करण्यात येईल. **(६)** ई-लिलावामध्ये यशस्वी न झालेल्या इतर सर्व बोलीदारांची ईएमडी ई-लिलाव बंद झाल्यापासून ७२ कामकाजाच्या तासांमध्ये केएमबीएलद्वारे परत करण्यात येईल. ईएमडीवर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही. **(७)** प्राधिकृत अधिकारी/प्रतिभूती धनकोद्वारे सदर तारण मालमत्तेच्या 'विक्री निश्चिती' दिनांकापासून पंधराव्या (१५व्या) दिवसांपर्यंत किंवा त्यापूर्वी किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे त्याच्या अखत्यारित लेखी स्वरुपात मंजूर केलेल्या वाढीव कालावधीमध्ये यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने खरेदी किंमतीची शिल्लक रक्कम भरणा करावयास हवी. सदर रक्कम न भरल्यास, तोपर्यंत जमा केलेली सर्व रक्कमा जप्त केल्या जातील. **(८)** मालमत्तेच्या तपासणीकरिता किंवा अधिक तपशिलाकरिता संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकारी, **श्री. रणजित म्हसे**, ईमेल : **Ranjit.Mhase@kotak.com**, **श्री. चिराग लोखंडे (मोबाईल क्र. ९७७३७५८२०८, ईमेल आयडी: Chirag.Lokhande@kotak.com)** यांना संपर्क साधावा. लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न दर्शविता आणि कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/फेटाळू/सुधारणा/रद्द करू शकतात किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतात. जर एखादी बोली फेटाळण्यात आल्यास, प्राधिकृत अधिकारी कोणत्याही प्रस्तुत किंवा इच्छुक बोलीदारांसह किंवा इतर पक्षांसह खाजगी करारादारे मालमत्तेच्या विक्रीकरिता बोलणी करू शकतात. **(९)** विक्री प्राधिकृत अधिकाऱ्याच्या मंजुरीच्या अधीन असेल. यशस्वी खरेदीदार/बोलीदारांनी लागू कायद्यानुसार मालमत्ता त्याच्या/तिच्या नावे हस्तांतरित/वितरित होण्याकरिता कोणतीही वैधानिक देणी, कर, देय शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. स्वतः भरावयाची आहेत. **(१०)** आयकर कायदा १९६२ नुसार म्हणजेच विक्री रक्कमेच्या १% टीडीएस वजा केला जाईल; **(११)** कर्जदार(रां)ची गहाणवटदार(रां)ची जामीनदार(रां)ची, ज्यांना **सरफैसी कायद्याच्या नियम ६(२), ८(६) आणि ९(१) अन्वये** देणी पूर्णतः मुक्त करण्याची आणि वर उल्लेखिल्यानुसार देणी व त्यासह आजवरचे व्याज आणि खर्च या सूचनेच्या दिनांकापासून तीस (३०) दिवसांमध्ये देण्याची **वैधानिक ११ दिवसांची** सूचना देण्यात आली होती, ज्यामध्ये अयशस्वी ठरल्यास तारण मालमत्ता वर उल्लेखिलेल्या अटी आणि शर्तीनुसार विक्री करण्यात येईल. इंग्रजीमधील आणि स्थानिक भाषेतील वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या विक्री सूचनेमध्ये काही विसंगती असल्यास, अशा प्रकरणात स्थानिक भाषेतील वृत्तपत्रास इंग्रजी वृत्तपत्रातील जाहिरात अधिग्रहित करेल आणि ती अंतिम प्रत मानली जाईल व त्यामुळे असपष्टता दूर होईल. जर कर्जदार(रां)नी जामीनदार(रां)नी/गहाणवटदार(रां)नी प्रतिभूती धनकोस देय असलेली रक्कम विक्री दिनांकापूर्वी पूर्णतः भरणा केल्यास विक्री थांबविण्यात येईल. प्रतिभूती धनको कर्जदारांना जामीनदारांना/गहाणवटदारांना स्पीड/नोंदणीकृत पोस्ट द्वारे विक्री सूचना पारित करेल. जर ती कोणत्याही पक्षकाराद्वारे स्वीकारली नाही, तर ही विक्री सूचनेची प्रसिद्धी त्या सेवेकरिता पर्यायी मार्ग मानला जाईल; **(१२)** सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, अन्वये विहीत अटी/शर्तींच्या अधीन राहून विक्री करण्यात येईल; विक्री नोंदणीक